# महाराष्ट्र राज्य
# विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**कार्यकारी सारांश**

**आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एकूण वार्षिक महसूलाची गरज आणि वीजदर निश्चितीकरण.**

**(महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग प्रकरण क्र. १२१/२०१४)**

# कार्यकारी सारांश

## अ) पूर्वपिठीका:-

बहुवार्षिक वीजदर विनियम २०११ च्या काही तरतुदीविषयी महावितरणने व्यक्त केलेली चिंता लक्षात घेता, माननीय आयोगाने दिनांक २३ ऑगस्ट २०११ (प्रकरण क्र. २४/२०११) रोजीच्या आदेशाद्वारे महावितरणला ३१ मार्च २०१३ पर्यंत (म्हणजे २ वर्षाच्या मुदतीसाठी ) बहुवार्षिक वीजदर विनियमानुसार वीजदर निश्चित करण्यापासून सुट दिलेली होती.

महावितरणच्या बहुवार्षिक वीजदर विनियमानुसार दाखल केलेल्या बहुवार्षिक वीजदर व्यवसाय आराखडयाच्या (बिझनेस प्लॉन) याचिकेवर मा. आयोगाने २६ ऑगस्ट २०१३ रोजी आदेश पारित केला. सदर आदेशात मा. आयोगाने महावितरणला आदेश जारी झाल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करण्याचे निर्देश दिले होते. पण, महावितरणने विहीत कालावधीत बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करण्यास असमर्थता व्यक्त केली व बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. महावितरणची विनंती लक्षात घेता मा. आयोगाने बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करण्यासाठी मुदतवाढीची परवानगी दिली होती. त्यानंतर महावितरणने विविध कारणास्तव, तसेच वीज बाजारात असलेल्या अनिश्चितेमुळे परत बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करण्यासाठी मुदतवाढ मागितली.

मा. आयोगाने दिनांक ३ मार्च २०१४ (प्रकरण.क्र.३८/२०१४) रोजीच्या अंतरीम आदेशांमध्ये महावितरणला बहुवार्षिक वीजदर याचिका दिनांक ३१ मे २०१४ पर्यंत सादर करण्याचे निर्देश दिलेले होते. त्यानुसार महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक वीजदर) विनियम, २०११ मधील तरतुदीनुसार द्वितीय नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी बहुवार्षिक वीजदर याचिका ७ जून २०१४ रोजी सादर केलेली होती. सदर याचिका आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या उपलब्ध माहितीच्या आधारे सादर करण्यात आलेली होती.

यानंतर, महावितरणचे आर्थिक वर्ष २०१३-१४ चे लेखा परिक्षण उपलब्ध झाले. त्यानुसार द्वितीय नियंत्रण कालावधी (आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६) करीता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक वीजदर) विनियम, २०११ मधील तरतुदीनुसार व आर्थिक वर्ष २०१३-१४ चे परिक्षित केलेल्या लेखांवर आधारीत बहुवार्षिक वीजदर याचिका दिनांक ०४ डिसेंबर २०१४ रोजी सादर केली आहे. या संबंधी पहिले तांत्रिक वैधता सत्र मा. आयोगाकडे दिनांक २४ डिसेंबर २०१४ रोजी आयोजिण्यात आले होते. महावितरणच्या सदर बहुवार्षिक वीजदर याचिकेबाबत मा. आयोग व अधिकृत ग्राहक प्रतिनिधी यांच्याकडून काही त्रुटींविषयी व अधिक माहितीविषयी (डेटा गॅप्स) विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार जादा माहितीची व त्रुटींची पुर्तता केल्यानंतर महावितरणच्या वीज दरापासून भरून काढावयाच्या निव्वळ महसूलातील तफावतीत बदल झाला असून मा. आयोगाने महावितरण कंपनीला त्रुटींची पुर्तता विचारात घेऊन सुधारित आकडेवाडीनुसार सुधारीत याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महावितरण आर्थिक वर्ष २०१३-१४ चे लेखापरिक्षित लेखांनुसार व आर्थिक वर्ष २०१४-१५ व आर्थिक वर्ष २०१५-१६ चे सुधारित अंदाजानुसार सुधारीत बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करीत आहे.

**ब) <u>वीज विक्रीचे अंदाजः-</u>**

आर्थिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ च्या पहिल्या सहामाहीसाठी (सप्टेंबर २०१४ पर्यंत) प्रत्यक्ष विज विक्री व आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या उर्वरित कालावधीसाठी अंदाजित विज विक्री प्रस्तावित केलेली आहे.

महावितरणने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीताच्या विज विक्रीच्या अंदाजीत आकडेवारीसाठी ऐतिहासिक कल पध्दत वापरली आहे. ही वीज विक्री अंदाजीत करण्याची साधारणपणे अचूक व वापरात असलेली सर्वमान्य स्विकृत पध्दत आहे. त्यानुसार महावितरणने मागील वर्षांचे १ वर्ष, ३ वर्ष व ५ वर्षाचे संयुक्त सरासरी विकास दरा (CAGR) प्रमाणे वर्गवारीनुसार वीज विक्री प्रस्तावित केलेली आहे. तथापि, जिथे असे आढळून आले की वापरण्यात आलेला कल अवाजवी वा असंयुक्तिक आहे, तिथे वास्तववादी कल गृहित धरून अंदाज केलेले आहेत.

आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी वर्गवारीनुसार प्रत्यक्ष वीज विक्री विचारात घेऊन महावितरणचे द्वितीय नियंत्रण कालावधीकरीता वीज विक्रीचा अंदाज खालील तक्त्याप्रमाणे दाखविला आहे.

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०१३-१४ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०१४-१५ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१५-१६ (अंदाजित) |
|---|---|---|---|
| उच्चदाब | | | |
| उच्चदाब - १ औद्योगिक | २२,४५४ | २४,०९६ | २५,७०७ |
| उच्चदाब -२ वाणिज्यिक | १,८६७ | २,१०२ | २,१३८ |
| उच्चदाब -३ रेल्वे | १,४३५ | १,४२८ | १,४९३ |
| उच्चदाब -४ सार्वजनिक पाणी पुरवठा | १,१५२ | १,१५२ | १,२७१ |
| उच्चदाब - ५ कृषि | ८०२ | ८६५ | ९९५ |
| उच्चदाब - ६ एकगठ्ठा पुरवठा | २१४ | २०८ | २१४ |
| उच्चदाब - ८ तात्पुरता पुरवठा | ४ | ४ | ४ |
| उच्चदाब - ९ सार्वजनिक सेवा | ७०० | ८२५ | ८८२ |
| उच्चदाब - १० बंदरे (पोर्टस) | ३७ | ७४ | ७४ |
| उच्चदाब-महानिर्मिती सहाय्यकारी पुरवठा | १४ | ७० | ७० |
| **एकूण उच्चदाब** | **२८,६७९** | **३०,८२४** | **३२,८४९** |
| लघुदाब | | | |
| दारिद्र्यरेषेखालील (०-३० युनिटस) | १३८ | १०५ | १३८ |
| वीजवापर > ३० युनिटस प्रति महिना | १५,०१३ | १६,५१४ | १८,१६६ |
| **एकूण घरगुती** | **१५,१५२** | **१६,६१८** | **१८,३०४** |
| लघुदाब - २ बिगर घरगुती | ३,५७३ | ३,७८६ | ४,०९१ |
| लघुदाब - ३ सार्वजनिक पाणी पुरवठा योजना | ५८८ | ६१८ | ६४९ |
| लघुदाब -४ कृषि | | | |
| मीटर रहित वीजदर | ९,९९१ | ९,४५० | ८,९७६ |
| मीटरवर आधारितवीजदर (कुक्कूटपालनासहित) | १०,८१७ | १२,११५ | १३,४३७ |
| **एकूण कृषि** | **२०,८०८** | **२१,५६५** | **२२,४१३** |
| लघुदाब -५ औद्योगिक | ५,३७३ | ५,७३६ | ६,२०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| लघुदाब - ६ पथदिवे | १,२६३ | १,४५० | १,६१३ |
| लघुदाब - ७ तात्पुरता विद्युत पुरवठा | २१ | १७ | १७ |
| लघुदाब - ८ जाहिराती आणि होर्डिंग्ज | ३ | ३ | ३ |
| लघुदाब - ९ स्मशानभुमी व दफनभुमी | २ | २ | २ |
| लघुदाब -१० सार्वजनिक सेवा | ८४ | १६३ | १७४ |
| लघुदाब -प्रीपेड ग्राहक(घरगुती) | १२ | १४ | १४ |
| वीज पुरवठा खंडीत केलेले ग्राहक | (२०) | (५) | |
| **एकूण लघुदाब** | **४६,८५९** | **४९,९६७** | **५३,४८९** |
| क्रेडीट वीज विक्री | ७३१ | | |
| मुक्त प्रवेश (ओपन ॲक्सेस) वीज विक्री | ३,४१४ | | |
| **महावितरणचे वीज विक्री** | **७९,६८३** | **८०,७९१** | **८६,३३८** |
| फ्रेंचायजी यांचे वर्गवारीनुसार वीज विक्री | ५,९४९ | ६,३९८ | ६,९८० |
| **महावितरणचे एकूण वीज विक्री** | **८५,६३१** | **८७,१८९** | **९३,३१६** |

**क) <u>वीज खरेदी :-</u>**

सर्व करार केलेल्या स्त्रोतांकडून वीज मिळविण्यासाठी महावितरण प्रयत्न करते. आर्थिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ चे प्रथम सहामाही (सप्टेंबर २०१४ पर्यंत) उपलब्ध माहितीचा स्त्रोत निहाय वीज खरेदी खर्च विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या उर्वरित कालावधीसाठी अंदाजित वीज खरेदी खर्च काढण्यात आला आहे. महावितरणने आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी अंदाजित वीज खरेदी खर्च विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज खरेदी खर्च प्रस्तावित केलेले आहे. स्त्रोत निहाय वीज खरेदी खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

| **स्त्रोत** | **आर्थिक वर्ष २०१३-१४ (प्रत्यक्ष)** | | | **आर्थिक वर्ष २०१४-१५ (अंदाजित)** | | | **आर्थिक वर्ष २०१५-१६ (अंदाजित)** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **द.ल.यु.** | **रु. कोटी** | **रु./युनिट** | **द.ल.यु.** | **रु. कोटी** | **रु./युनिट** | **द.ल.यु.** | **रु. कोटी** | **रु./युनिट** |
| महानिर्मिती | ४१,३३६ | १४,८६२ | ३.६० | ४४,३९८ | १६,८९१ | ३.८० | ५१,०८७ | १६,४४६ | ३.२२ |
| एनटीपीसी | २४,८२१ | ६,७८३ | २.७३ | २५,३५४ | ७,९०८ | ३.१२ | २७,०२५ | ९,०३३ | ३.३४ |
| एनपीसीआयएल | ५,०३३ | १,२१३ | २.४१ | ५,५६४ | १,३६७ | २.४६ | ५,५५० | १,४४० | २.६० |
| एसएसपी | १,५३९ | ३१६ | २.०५ | ८११ | १६६ | २.०५ | १,२०० | २४६ | २.०५ |
| पेंच | १३१ | २७ | २.०५ | १०९ | २२ | २.०५ | १३० | २७ | २.०५ |
| आरजीपीपीएल | १,४३८ | ४७० | ३.२७ | | | | | | |
| डॉडसन | ८६ | २७ | ३.१० | ११९ | २८ | २.३४ | १२० | २८ | २.३५ |
| जेएसडब्ल्यू | १,९७८ | ६१४ | ३.१० | २,०६१ | ५९६ | २.८९ | १,९२७ | ५७० | २.९६ |
| अदानी पॉवर | ९,५९३ | २,७३६ | २.८५ | १५,५९८ | ४,८०७ | ३.०८ | १७,५८७ | ५,३२५ | ३.०३ |
| मुंद्रा युएमपीपी | ४,९०८ | १,२२० | २.४९ | ४,९५५ | १,१९३ | २.४१ | ५,१५८ | १,२२८ | २.३८ |
| इंडिया बुल्स | १,०३४ | ३३४ | ३.२३ | २,१७४ | ६८२ | ३.१४ | ५,३१९ | १,९१५ | ३.६० |
| एनसीई | ६,४०९ | ३,३४७ | ५.२२ | ८,८३४ | ४,८९० | ५.५४ | ११,२१८ | ६,६७१ | ५.९५ |
| सीपीपी | १,२७४ | ३७७ | २.९६ | १,०९४ | २६१ | २.३९ | १,९७७ | ५२३ | २.६४ |
| एमको एनर्जी | ६९ | १९ | २.७१ | १,३६६ | ३७७ | २.७६ | १,३७० | ३७४ | २.७३ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट्रेडर्स | १,६९७ | ५२५ | ३.०९ | १,९५२ | ७४६ | | | | |
| इतर* | (१,२३२) | १,०५५ | | ५७ | १,२४६ | | | १,२५९ | |
| **एकूण** | **१००,११५** | **३३,९२२** | **३.३९** | **११४,४४८** | **४१,१८१** | **३.६०** | **१२९,६६९** | **४५,०८५** | **३.४८** |

** इतर वीज खरेदी स्त्रोतांमध्ये एफबीएसएम, युआय व पीजीसीआयएल चा समावेश आहे.*

### ड) ऊर्जा संतुलन :-

विजेची उपलब्धता, वीज विक्रीचा अंदाज, पारेषण व वितरण हानी यांच्या आधारे महावितरणने द्वितीय नियंत्रण कालावधीसाठी ऊर्जा संतुलनाची परिगणना केली आहे.

अलीकडच्या काही वर्षात महावितरणने वितरण हानी कमी करण्यात लक्षणीय यश मिळविले आहे. हे प्रयत्न या पुढे ही कायम राखून उत्तरोत्तर ते वाढविण्यात येतील. मात्र, वितरण हानी कमी करण्याची प्रक्रिया ही संथ गतीने होणारी प्रक्रिया आहे. तसेच हानीची पातळी कमी झाल्यावर ती आणखी कमी करणे अधिकच अवघड होते. या बाबी विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१४-१५ व आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये वितरण हानी ०.२५ टक्के प्रति वर्ष कमी होईल असे महावितरणने गृहीत धरले आहे.

आर्थिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ साठीचे वीज खरेदी योजना आणि अंदाजित वीज विक्रीवर आधारीत तसेच आंतरराज्य पारेषण हानी ५% ते ६% विचारात घेऊन व उर्वरीत ऊर्जेची वीज विक्री (ट्रेडींग) विचारात घेऊन महावितरणनी ऊर्जा संतुलनाची परिगणना केली आहे.

या आधारे महावितरणचे तीन वर्षासाठीचे ऊर्जा संतुलन खालील तक्त्यात दाखविण्यात आले आहे.

| अ.क्र. | तपशील | युनिट | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | (प्रत्यक्ष) | (अंदाजित) | (अंदाजित) |
| | **महाराष्ट्रांतर्गत** | | | | |
| १ | महानिर्मितीकडून केलेली वीज खरेदी | **द.ल.यु.** | ४१,३३६ | ४४,३९८ | ५१,०८७ |
| २ | एन पी सी आय एल तारापूर | **द.ल.यु.** | ३,८६५ | ४,५३० | ४,५०० |
| ३ | अन्य स्त्रोतांकडून व मध्यम कालीन वीज खरेदी | **द.ल.यु.** | २१,८८१ | ३१,२४७ | ३९,५१९ |
| ४ | व्यापारी (ट्रेडर्स) | **द.ल.यु.** | १,६९७ | १,९५२ | |
| ५ | आयबीएसएम + एफबीएसएम | **द.ल.यु.** | (१,२३२) | ५७ | |
| ६ | महावितरणच्या प्रणालीतील अन्य वितरण परवानाधारकांची वीज | **द.ल.यु.** | ४,४५९ | | |
| ७ | *इन्फर्म पॉवर* | **द.ल.यु.** | ५७० | | |
| ***८*** | **महाराष्ट्रांतर्गत एकूण वीजखरेदी** | **द.ल.यु.** | **७२,५७६** | **८२,१८४** | **९५,१०५** |
| | **महाराष्ट्रा बाहेरील** | | | | |
| ९ | केंद्रीय विद्युत निर्मिती केंद्र + एनपीसीआयएल + युएमपीपी +सरदार सरोवर+पेंच +बँकींग | **द.ल.यु.** | ३२,५६८ | ३२,२६४ | ३४,५६३ |
| १० | **महाराष्ट्रा बाहेरील एकूण वीजखरेदी** | **द.ल.यु.** | ३२,५६८ | ३२,२६४ | ३४,५६३ |
| ११ | आंतरराज्य पारेषण हानी | % | ५.५३% | ५.१६% | ५.०७% |
| १२ | महाराष्ट्राच्या सीमेवर उपलब्ध एकूण वीज | **द.ल.यु.** | ३०,७६८ | ३०,६०० | ३२,८११ |
| १३ | देय असलेली एकूण वीज खरेदी | **द.ल.यु.** | १०५,१४५ | ११४,४४८ | १२९,६६९ |
| **१४** | **पारेषण सीमेवरील उपलब्ध असलेली एकूण वीज** | **द.ल.यु.** | **१०३,३४४** | **११२,७८३** | **१२७,९१६** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **वितरण परिसीमेवर उपलब्ध वीज** | | | | |
| १५ | राज्यातंर्गत पारेषण हानी | % | ४.०८% | ४.०८% | ४.०८% |
| १६ | वितरण सीमेवरील ३३ केव्ही व त्यावरील पातळीवर उपलब्ध वीज | **द.ल.यु.** | ९९,१२८ | १०८,१८२ | १२२,६९७ |
| १७ | ३३ केव्ही वाहिनीवरुन अंतक्षेपित करुन ३३ केव्ही वाहिनीवरच वापर झालेली वितरण सीमेवरील वीज | **द.ल.यु.** | ४४७ | ४४७ | ४४७ |
| १८ | वितरण सीमेवर उपलब्ध वीज | **द.ल.यु.** | ९९,५७५ | १०८,६२९ | १२३,१४४ |
| १९ | वितरण हानी (%) | % | १४.००% | १३.७५% | १३.५०% |
| २० | वितरण हानी (युनिट) | **द.ल.यु.** | १३,९४४ | १४,९४० | १६,६२८ |
| **२१** | **विक्रीसाठी उपलब्ध वीज** | **द.ल.यु.** | **८५,६३१*** | **९३,६८९** | **१०६,५१६** |
| २२ | ग्राहकांना किरकोळ वीज विक्री | **द.ल.यु.** | ८५,६३१ | ८७,१८९ | ९३,३१६ |
| **२३** | **विक्रीसाठी उपलब्ध अतिरिक्त वीज** | **द.ल.यु.** | **४८४** | **६,५००** | **१३,२००** |

** आर्थिक वर्ष २०१३-१४ साठीचे लेखापरिक्षित वीज विक्री व वीज खरेदीचे लेखापरिक्षित वार्षिक खातेनुसार ऊर्जा संतुलन तयार केलेले आहे.*

**ई) वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण :-**

मा. आयोगाने द्वितीय नियंत्रण कालावधीकरीता आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ (प्रकरण क्र. १३४/२०१२) बहुवार्षिक वीजदर व्यवसाय आराखडा दि. २६ ऑगस्ट २०१३ च्या आदेशानुसार मंजूर केले असून सदर आदेशात वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरणाची टक्केवारी खालीलप्रमाणे मंजूर केलेली आहे.

| तपशिल | वायर व्यवसाय | वितरण व्यवसाय |
|---|---|---|
| वीज खरेदी खर्च स्थिर आकार | ५% | ९५% |
| वीज खरेदी खर्च वीज आकार | ०% | १००% |
| कर्मचाऱ्यांवरील खर्च | ७५% | २५% |
| प्रशासन विषयक व सर्वसाधारण खर्च | ७५% | २५% |
| दुरूस्ती व देखभाल यावरील खर्च | ९५% | ५% |
| घसारा | ९०% | १०% |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ९०% | १०% |
| खेळत्या भांडवलीवरील व्याज | १००% | ०% |
| अन्य वित्तीय खर्च | ९०% | १०% |
| बुडीत रक्कमेसाठीची तरतुद | १०% | ९०% |
| अन्य खर्च | ०% | १००% |
| आयकर | ९०% | १०% |
| महापारेषणला प्रदान केलेला पारेषण आकार | ०% | १००% |
| आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीची तरतुद | ९०% | १०% |
| प्रोत्साहन / सवलत | ०% | १००% |
| समभाग भांडवलावरील परतावा | ९०% | १०% |
| वीजदरा व्यतिरिक्त संकीर्ण महसूली उत्पन्न | ०% | १००% |
| वहन आकारातून मिळालेले उत्पन्न | १००% | ०% |

**फ) <u>द्वितीय नियंत्रण कालावधीकरीता एकूण महसुलाची गरज</u> :-**

आर्थिक वर्ष २०१३-१४ ची लेखा परिक्षीत आकडेवारी आर्थिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ ची अंदाजीत आक डेवारी आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक वीजदर) विनियम, २०११ प्रमाणे महावितरणने द्वितीय नियंत्रण कालावधीकरीता खालीलप्रमाणे एकूण महसुलाची आवश्यकता / गरज प्रस्तावित केली आहे.

| तपशिल | आ.व. २०१३-१४ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१४-१५ (अंदाजित) | आ.व. २०१५-१६ (अंदाजित) |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च (आंतरराज्य पारेषण आकारासहित) | ३३,९२२ | ४१,१८१ | ४५,०८५ |
| **संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च** | ५,३२० | ६,२८९ | ७,१२३ |
| घसारा खर्च | १,८५९ | २,०८८ | २,२८९ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,४३८ | १,४४६ | १,५०१ |
| खेळते भांडवल व ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | १,१२९ | २,४४५ | ९६२ |
| बुडित रकमेसाठीची तरतूद | ३५३ | ३५३ | ३५३ |
| अन्य खर्च | २५६ | ९३ | ९८ |
| आयकर | १०३ | १०३ | १०३ |
| पारेषण अनुज्ञप्तिधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार | ५,६०४ | ५,४९० | ६,३२० |
| आकस्मिक खर्चांसाठीच्या राखीव निधीची तरतूद | - | ९५ | १०५ |
| प्रोत्साहन / सवलत | २१९ | २३० | २४२ |
| पुर्वकालीन खर्च | ७३९ | - | - |
| **एकूण महसुली खर्च** | **५०,९४२** | **५९,८१२** | **६४,१८१** |
| भाग भांडवला वरील परतावा | १,५१७ | १,६६५ | १,७८४ |
| **एकूण महसूलाची गरज** | **५२,४५९** | **६१,४७७** | **६५,९६५** |
| वजा : वीजदरा व्यतिरिक्त उत्पन्न | १,६४० | १,७२२ | १,८०७ |
| वजाः वहन आकारातून मिळालेले उत्पन्न | १९ | २० | २१ |
| वजाः ओपन ॲक्सेस चार्जेस पासूनचे उत्पन्न | ४०४ | ४२४ | ४४५ |
| अधिकःआर.एल.सी .परतावा | ४०२ | ४८८ | - |
| **किरकोळ दरापासून आवश्यक असणारा एकूण महसूल** | **५०,७९८** | **५९,८००** | **६३,६९२** |
| वजाः वीज विक्रीतून मिळणारा एकूण महसूल | ५०,९६१ | ५४,०२० | ५९,४१९ |
| वजाः वीज विक्रीतून मिळणारा अतिरिक्त महसूल | ९८ | २,३३९ | ४,५९० |
| **महसूलातील तूट** | **(२६१)** | **३,४४२** | **(३१६)** |

आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ ची महसुली तुट, प्रकरण क्रमांक ३८/२०१४ मधील आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ ची उर्वरित महसुली तुट, प्र.क्र.२०१३ चे १०५ मधील अविरत (एक्सप्रेस) व

अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस) वीज दरामधील तफावत / फरकाचा परतावा, आर्थिक वर्ष २००७-०८ साठी नामंजूर झालेला भांडवली संबंधित खर्च व आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ चे आयकर या बाबींचा विचार करून महावितरणची एकूण महसूली तूट खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे रु. ४७१७ कोटी एवढी आहे.

| **तपशिल** | **रक्कम (रू.कोटी)** |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१३-१४ करीताची महसुली तुट | (२६१) |
| आर्थिक वर्ष २०१४-१५ करीताची महसुली तुट | ३,४४२ |
| आर्थिक वर्ष २०१५-१६ करीताची महसुली तुट | (३१६) |
| आर्थिक वर्ष २०१२-१३ करीताची अंतिम अचुक समायोजन पोटीची उर्वरीत तुट | १,६३९ |
| अपिलीय प्राधिकरणाच्या भांडवली खर्च संबंधी आदेशाचा परिणाम | ५४ |
| मा.आयोगाच्या प्र.क्र.१०५ / २०१३ च्या आदेशान्वये परतावा | ८३ |
| प्र.क्र.३८ / २०१४ च्या आदेशान्वये अमान्य केलेली आयकराची रक्कम | ७७ |
| **महावितरणची एकूण महसुलातील तुट** | **४,७१७** |

**जी) <u>वीजदर रचनासंबंधी सुचना</u> :-**

- **खर्च वसुली व वीजेचा किफायतशीर वापर**

  महावितरण येथे नमुद करू इच्छिते की, सदर याचिका हा बहुवर्षीय वीजदर कालावधीमध्ये गणना केलेली महसुली तुटीची पुर्णतः वसुली व्हावी या तत्वावर आधारित आहे. सध्या लागू असलेल्या बहुवर्षीय वीजदर कालावधी पैकी सध्या साधारणतः एक वर्षाचाच कालावधी राहिल्याने वीज क्षेत्रातील प्रगतीस अनुसरून व महावितरणची त्या अनुषंगाने आर्थिक हानी टाळण्याकरीता महसुली तुट वसुलीबाबत व्यापारी तत्वावर विचार करणे आवश्यक आहे असे महावितरणचे मत आहे. तसेच महावितरण पुढे अशी ही विनंती करू इच्छिते की, मा. आयोगाने अशी मार्गदर्शक तत्वे / तरतूदी प्रस्तावित कराव्यात जेणेकरुन, ग्राहकांना कार्यक्षम वीजवापर करण्याकरीता प्रोत्साहन मिळेल व योग्य त्या वीजदर निर्देशकांमुळे वीजवापरामध्ये शिस्त येईल.

- **स्थिर आकारांचे वाजवीकरण**

  राज्यातील वीजपुरवठा परिस्थितीतील झालेली सुधारणा, बहुसंख्य ग्राहकांना मिळणारा अखंडीत वीजपुरवठा तसेच स्थिर खर्च व स्थिर आकारांतुन होणारी वसूली या मधील तफावत या सर्व बाबींचा विचार करता, महावितरणतर्फे स्थिर / मागणी आकारांचे विविध वर्गवारी करीता १५% व घरगुती ग्राहकांच्या स्थिर आकारात २५% पर्यंत वाढ करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर विनंती ही मा. आयोगाच्या स्थिर खर्चाची वसुली ही स्थिर आकारांतुन व्हावी या निरिक्षणास धरुन आहे.

- **अविरत व अविरत नसलेल्या वर्गवारींचे एकत्रीकरण**

महावितरणचे भारनियमन मुक्तीसाठीचे सातत्याने प्रयत्न व पुरेश्या वीजेची उपलब्धता यामुळे राज्यातील बहुतांश भागातून भारनियमन मागे घेण्यात आलेले आहे (जवळजवळ ८५% वाहिन्या भारनियमन मुक्त). महावितरण सादर करते की, वीजेच्या मुबलक उपलब्धतेमुळे अविरत व अविरत नसलेल्या असे वर्गवारीचे विभाजन संपूष्टात आणणे गरजेचे आहे. त्यामुळे महावितरणद्वारे असे प्रस्तावित करण्यात येते की अविरत व अविरत नसलेल्या असे वर्गवारीचे एकत्रिकरण करुन दोन्ही वर्गवारीवारींचा वीजदर (स्थिर आकार व विद्युत आकार) समकक्ष पातळीत आणून समान वीजदर आकारणी करण्यात यावी.

- **घरगुती ग्राहकांकरीता नवीन दर टप्प्यांची प्रस्तावना**

घरगुती ग्राहकांसाठी सध्याचे वीजदरातील टप्पे निहाय दर हे बऱ्याच कालावधीपासून प्रचलित आहेत. परंतु सध्याची बदललेली आर्थिक व सामाजिक स्थिती तसेच वीजेचा वापर यामुळे प्रचलित वीजवापरातील टप्प्यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

विविध पातळयांवर झालेल्या चर्चा व त्या अनुषंगाने सध्याच्या घरगुती ग्राहक दर टप्प्यांमध्ये असलेल्या विविध त्रुटींचा विचार करून ग्राहकांच्या मासिक वीज वापरावर आधारीत घरगुती ग्राहकांच्या दर टप्प्यांमध्ये पुढीलप्रमाणे बदल प्रस्तावित केले आहे.

पहिल्या दोन उप वर्गवारींचे दर, ज्यामध्ये साधारण: ८०% घरगुती ग्राहकांचा वीजवापर आहे, त्या वापरांचे पुर्न:वर्गीकरण, पैसे भरण्याची क्षमता व मासिक वीज वापराची गरज धरून प्रस्तावित केली आहे.

**(i) दारिद्रय रेषेखालील : वीज वापर प्रति महिना ३० युनिट्स पर्यंत. (० ते ३० युनिट)**

**(ii) अन्य घरगुती ग्राहक : वीज वापर प्रति महिना ३० युनिट्स पेक्षा जास्त.**

| | |
|---|---|
| १. | वीजवापर १२५ युनिट्स पर्यंत प्रति महिना.<br>अ) ०-७५ युनिट्स<br>ब) ७६-१२५ युनिट्स |
| २. | वीजवापर १२६-३०० युनिट्स पर्यंत प्रति महिना.<br>अ) ०-१२५ युनिट्स<br>ब) १२६-३०० युनिट्स |
| ३. | वीजवापर ३०१ ते ५०० युनिट्स पर्यंत प्रति महिना.<br>अ) ०-१२५ युनिट्स<br>ब) १२६-३०० युनिट्स<br>क) ३०१-५०० युनिट्स |
| ४. | वीजवापर ५०१ ते १००० युनिट्स प्रति महिना. |
| ५. | वीजवापर १००० युनिट्स प्रति महिना पेक्षा अधिक. |

वरील उप वर्गवारी १ ते ३ करीता मासिक वीजेची आवश्यकता व वीजदेयक अदा करण्याची क्षमता विचारात घेऊन उपवर्गवारी प्रस्तावित केलेली आहे. पुढे,०-७५ या उप वर्गवारीकरीता (वापर १२५ युनिट्सपेक्षा कमी) महावितरणने कुठलाही बदल प्रस्तावित केलेला नाही. उप वर्गवारी ४ ते ५ ही वीजेच्या सुखसोयींसाठी करण्यात येणारा वापर आणि वीजदेयक अदा करण्याची क्षमता विचारात घेऊन संपूर्ण वीज वापरासाठी समान वीजदर प्रस्तावित केलेला आहे.

- **शेती वर्गवारीकरीता वीजदर**

राष्ट्रीय वीजदर धोरणाच्या अनुषंगाने शेती ग्राहकांची वीजबील भरणा करण्याची क्षमता विचारात घेता शेती ग्राहकांना पुर्वापार, अनुदानित व कमी वीजदराची आकारणी करण्यात येते. मात्र शेती ग्राहकांना तोंड दयाव्या लागणाऱ्या विविध अडचणी व खडतर परिस्थितीचा विचार करता शेती ग्राहकांच्या वीजदरांचे वाजवीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याप्रमाणे महावितरणद्वारे कृषी ग्राहकांना लागू असलेल्या वीज आकारात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

- **लघुदाब औद्योगिक २० कि. वॅ. पेक्षा अधिक वापर असणाऱ्या ग्राहकांचे वीजदर**

मा. आयोगाने महानिर्मिती व महापारेषण संदर्भात अलिकडे विविध आदेश दिले असून महावितरणसंबंधी अंतरिम आदेश मार्च २०१४ मध्ये पारित केला. मा.आयोगाद्वारे मान्यता प्राप्त पध्दतीचा विचारकरता, लघुदाब ५- औद्योगिक २० कि. वॅ पेक्षा अधिक (२७ अ.श. पेक्षा अधिक) वीजवापर असलेले ग्राहकांचा वीजदर हा उच्चदाब औद्योगिक (अविरत वाहिनी) ग्राहकांपेक्षा जास्त दिसून येत आहे. सदर बाबतीत विविध ग्राहक प्रतिनिधींद्वारे विविध व्यासपीठांवर आक्षेप नोंदविण्यात आलेला असून सद्य:स्थितीचे पुर्नविलोकन करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने महावितरणतर्फे लघुदाब ५ औद्योगिक ग्राहक २०कि. वॅ. पेक्षा अधिक वीजवापर असणाऱ्या वर्गवारींचे विद्युत आकार उच्चदाब औद्योगिक ग्राहक वर्गवारीच्या समकक्षेत आणण्याचे प्रस्तावित केले आहे.

- **रात्रीच्या कालावधीतील वीजवापरावरील सवलतीचे (टीओडी ) वाजवीकरण**

रात्रीच्या कालावधीतील वीजवापरावरील वाढीव सवलतीमुळे दिवसाच्या कालावधीतील मागणी ही रात्रीच्या कालावधीत अपेक्षेप्रमाणे विस्थापीत झाल्याचे दिसून आलेले नाही. महावितरण सादर करते की, दिवसाच्या कालावधीतील मागणी व रात्रीच्या कालावधीतील मागणी जवळपास सारखीच असून भार आलेख (लोड कर्व्ह) सुध्दा जवळपास एकसमान आहे. त्यामुळे सदर अतिरिक्त सवलतीचा लाभ मोजकेच ग्राहक घेत आहेत, मात्र याचा बोजा महावितरणच्या सर्व ग्राहकांवर पडत आहे.

महावितरणला असे वाटते की, रात्रीच्या वीजवापरावरील सवलतीचा लाभ हा कुठल्याही भेदभावाशिवाय सवलतीस पात्र अशा रात्रपाळीत उदयोग चालविणाऱ्या सर्व ग्राहकांना एक समान मिळावा. त्या अनुषंगाने महावितरण रात्रीच्या कालावधीतील वीजवापरावरील सवलत ही मा. आयोगाच्या १६ ऑगस्ट २०१२ रोजीच्या आदेशाच्या समकक्षेत आणण्याच्या प्रयत्नात असून, त्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून सदर सवलतीत कपात करण्याचे व ही सवलत रू.१.५० प्रति युनिट इतकी प्रस्तावित करत आहे. तरी देखील ही सवलत मा. आयोगाच्या १६ ऑगस्ट २०१२ रोजीच्या आदेशातील (प्र.क्र.१९/२०१२) निर्णयापेक्षा अधिक आहे.

- **पॉवर फॅक्टर सवलतीचे वाजवीकरण**

महाराष्ट्र हे नेहमीच प्रगतशिल राज्य राहिले असून महावितरणने कार्यक्षम वीज वापरास नेहमी प्रोत्साहन दिलेले आहे. मा. आयोगाने याबाबतीत पुढाकार घेऊन ज्या ग्राहकांचा पॉवर फॅक्टर ९५% पेक्षा अधिक राहील अशा ग्राहकांना सवलत देऊन अधिक कार्यकुशलपणे वीजवापर व भार व्यवस्थापन करण्यास प्रोत्साहित केलेले आहे. अशाप्रकारे मा.आयोगाने जर ग्राहकांचा पॉवर फॅक्टर ०.९९ असल्यास ५% वीज बिलात सवलत व युनिटी पॉवर फॅक्टर असल्यास ७% वीज बिलात सवलत लागू केली आहे. जास्त पॉवर फॅक्टर हा नेहमीच वीजप्रणालीस उपयुक्त ठरतो. महावितरणला असे वाटते की, वीज प्रणालीचे अनुशासन ही सार्वत्रिक जबाबदारी आहे व त्यामुळे पॉवर फॅक्टर सवलत ही टप्प्याटप्प्याने कमी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महावितरणतर्फे युनिटी पॉवर फॅक्टर करिता ही सवलत ५% पर्यंत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

- **पथदिव्यांकरिता वीजदर**

वीजेचा कार्यक्षम वापर हा सर्वांना उपयुक्त आहे. परंतु कार्यक्षम वीज वापरास उदयूक्त करणारे वीजदर नसल्याने ग्राहक वीजेचा कार्यक्षम वीज वापर करतांना दिसून येत नाही तसेच अनेक महानगरपालिका, नगरपरिषदा पथदिव्यांचा वीज वापर कार्यक्षमतेने करताना दिसुन येत नाही. कित्येक वेळी दिवसा देखील पथदिवे चालू असल्याचे आढळून येते. यासाठी योग्य तो आर्थिक इशारा वाया जाणारा वीजवापर कमी करायला उपयुक्त ठरेल. सदर परिस्थिती लक्षात घेता, महावितरणतर्फे पथदिव्यांच्या वीजदरांचे वाजवीकरण करण्याचे प्रस्थावित करण्यात येत आहे. ग्रामपंचायत तसेच अ, ब व क नगरपरिषद या क्षेत्रातील पथदिव्यांकरिता वीजदरआकारणी ही आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या सरासरी वीज खर्चाच्या पातळीवर आणि महानगर पालिका क्षेत्रातील पथदिव्यांकरिता वीजदर ही आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या सरासरी वीज खर्चाच्या ५% अधिक करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

- **आंतरराज्य वीजदर**

पुर्वी त्यावेळेच्या परिस्थितीमुळे व भारतीय वीज कायदा १९१० (now repealed) च्या कलम २७ अन्वये पुर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ द्वारे शेजारील राज्यातील सीमाप्रदेश भागांतील गावामधील ग्राहकांना वीज पुरवठा केला होता. त्याचप्रमाणे काही परिस्थितीत महावितरणच्या सीमेजवळील भागातील अनेक ग्राहकांना वीज पुरवठा करणे महावितरणला शक्य होत नाही, अशा ग्राहकांना शेजारील राज्यांकडून वीज पुरवठा करण्यात येत आहे.

महावितरण सध्याच्या वीजदर तरतुदींवर आधारीत अशा आंतरराज्य ग्राहकांकरिता खालील बाबी प्रस्तावित करण्यात येत आहे.

I. वैयक्तिक वीज वापराकरिता मा. आयोगाचे वर्गवारी निहाय दर लागू व्हावे.

II. एक गठ्ठा एकल बिंदू (सिंगल पॉईंट) वीज जोडणी ही त्यानंतर इतर ग्राहकांना वीज पुरवठयाकरिता हवी आहे अशा ग्राहकांकरिता मा. आयोग ठरवेल त्या वीजदरांने वीज आकारणी

III. जेथे दोन राज्यांमधील वीजेचे आदान प्रदान होत असेल अशा परिस्थित परस्पर स्विकृत दरांद्वारे वीज आकारणी.

- **नवीन उच्चदाब घरगुती वर्गवारीची निर्मिती व एक गठ्ठा पुरवठा वर्गवारी काढून टाकणे**

मा. आयोगाच्या आदेशान्वये ज्या वाणिज्यिक ग्राहकांना एकल बिंदू (सिंगल पॉईंट) पुरवठा हवाय अशा ग्राहकांना फ्रेन्चाईजी मार्गे किंवा त्यास लागू असलेल्या योग्य त्या वर्गवारीच्या अनुषंगाने वेगवेगळा वीज जोडणी घ्यावी लागेल असे प्रविधान आहे. त्यामुळे सदर वर्गवारीतील दर कुठल्याही ग्राहकांना लागू होत नव्हते म्हणून महावितरणतर्फे एकगठ्ठा पुरवठा वर्गवारी समाप्त करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

महावितरणतर्फे असे प्रस्तावित करण्यात येते की, घरगुती वापरातील ज्या ग्राहकांना उच्च दाबाने पुरवठा घ्यावायाचा आहे अशा ग्राहकांना उच्चदाब घरगुती या नवीन वर्गवारीद्वारे वीज पुरवठा करण्यास परवानगी देण्यात यावी.

- **सरकारी मालकी /व्यवस्थापनाद्वारे चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्था व दवाखाने**

महावितरण असे प्रस्तावित करु इच्छिते की, सरकारी मालकी /व्यवस्थापना द्वारे चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थासाठी (जिल्हा परिषद/नगरपरिषद व महानगरपालिके द्वारा चालविण्यात येणा-या शाळा, शासकीय वैद्यकीय /अभियांत्रिकी महाविद्यालये इत्यादी, शासकिय अनुदानीत संस्था वगळून) वेगळी वर्गवारी करण्यात यावी. सदर वर्गवारीत शासन मालकीची अथवा व्यवस्थापनाद्वारे चालविण्यात येणारे दवाखाने (प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी दवाखाने इत्यादी) यांचा समावेश करण्यात यावा. तसेच या वर्गवारीकरिता वीजदर हा आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या सरासरी वीज खर्चाच्या समकक्ष असावा.

- **विविध वर्गवारी मधील क्रॅास सबसिडी**

राष्ट्रीय वीज धोरणानुसार ग्राहकांच्या वीजदरात अधिकाअधिक वीज खर्च प्रतीबिबींत होणे अभिप्रेत आहे. महावितरण येथे असे नमुद करु इच्छिते की, काही ग्राहक वर्गवारींचा वीजदर हा राष्ट्रीय वीज धोंरणात नमुद सरासरी वीजदराच्या ($\pm$२०%) मर्यादिपेक्षा जास्त आहे. ही बाब लक्षात घेता महावितरणतर्फे काही वर्गवारींच्या वीजदराचे वाजवीकरण करण्याचे प्रस्तावित करीत आहे जेणेकरुन त्यांचा वीजदर हा सरासरी वीज दराच्या जवळ राहील. यामुळे काही वर्गवारींच्या वीजदरात घट अपेक्षित आहे. अशा प्रकारे क्रॅास सबसिडी अदा करणा-या वर्गवारीच्या वीजदराचे वाजवीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**एच) इतर सुचना**

- **विविध नियामक मंचाचे आदेश**

एकूण महसुलाची गरज ही विविध संस्था जसे महानिर्मिती, महापारेषण, आरजीपीपीएल, एनटीपीसी व आयपीपीज इत्यादी यांच्या माहितीवर आधारीत आहे. सदर माहिती मध्ये विविध नियामक संस्था व न्यायीक संस्था यांच्या निर्णयांमुळे बदल होऊ शकतो. यामुळे महसुलातील अंदाजित तफावतीत

फरक पडण्याची शक्यता असते. परंतु या फरकाचा अंदाज या पातळीवर वर्तविणे शक्य नाही. महावितरण मा. आयोगाला अशी विनंती करीत आहे की, जेव्हा अशा प्रकारची मागणी उत्पन्न हाईल तेव्हा ती योग्य त्या यंत्रणेद्वारे त्वरीत वसूल करण्याची परवानगी देण्यात यावी. हेच तत्व इतर कायदेशीर प्रकरणांना ज्यांना महावितरण आव्हान देईल किंवा या अगोदरच विविध कायदेशीर/न्यायिक मंचापुढे आव्हान दिले आहे त्यांना लागू करावे.

- **कॅप्टीव्ह वीज निर्मितीकरीता स्टँडबाय दर**

महावितरण कॅप्टीव्ह वीज निर्मितीकरीता अस्तित्वात असलेल्या स्टॅंडबाय दरा संदर्भात खालीलप्रमाणे तरतुदीत सुधारणा करत आहे.

ज्या उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना स्वत:ची वीज निर्मितीची सुविधा आहे व ग्रिडला जोडलेले आहेत ते मंजूर स्टँडबाय करारांतर्गत रू.२० प्रति केव्हीए/महिना जादा मागणी दर भरतील आणि जर करारांतर्गत मागणी (कॉन्ट्रॅक्ट डिमांड) पेक्षा, नोंद झालेली मागणी जास्त असल्यानंतर नोंद झालेल्या मागणीला स्टॅडबाय मागणी पर्यंतच सामान्य मागणी आकार लागू होईल यापुढील एकूण मागणीला (कॉन्ट्रक्ट डिमांड + स्टॅडबाय डिमांड) कॉन्ट्रक्ट डिमांडपेक्षा जास्त वापराचा दंड लागू होईल.

- **उच्चतम मागणी व्यतिरिक्त कालावधीतील बिलींग डिमांड**

बिलींग डिमांडच्या संदर्भातील सध्या अस्तित्वात असलेल्या तरतुदीमध्ये सुधारणा करावी आणि उच्चतम मागणीच्या काळा व्यतिरिक्त कालावधीत (ऑफ पीक पिरीयड) नोंदल्या जाणाऱ्या वीजेच्या मागणीचा बिलींग डिमांडसाठी विचार केला जावा असे महावितरण मा. आयोगाला प्रस्तावित करीत आहे. तसेच महावितरण असेही सुचवू इच्छितो की, ज्या ग्राहकांनी रात्रीच्या कालावधीत मंजूर करारातील मागणी (कॉन्ट्रॅक्ट डिमांड) पेक्षा जास्त वीज वापरली त्यांना "लोड फॅक्टर इन्सेंटीव्ह" देण्यासाठी पात्र समजण्यात येऊ नये.

- **वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करण्याचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०१४ नुसार जोडणी देण्याकरीता भार पातळीमध्ये वाढ :-**

वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके विनियम २०१४ मधील तरतुदीनुसार, जिथे जिथे शक्य आहे महावितरण तिथे वीज जोडणी देत आहे. मात्र वाढलेल्या वीजभाराचा व उपलब्ध पायाभूत सुविधेचा विचार करता, महावितरणला वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके विनियम २०१४ प्रमाणे वाढलेल्या भारांप्रमाणे जोडणी देण्याकरीता मर्यादा आहेत. महावितरण सादर करु इच्छिते की, सुधारीत लोड पातळीनुसार वीज जोडणी दिल्यामुळे प्रणाली वितरण हानी ०.१% ते ०.२% ने वाढू शकते म्हणजे अंदाजे रू.५० कोटी ते १०० कोटी प्रति वर्ष आणि ही वितरण हानी वितरण प्रणाली मध्ये नेहमी करीता असेल. म्हणून, महावितरणच्या सामान्य ग्राहकांवरील आर्थिक बोजा टाळण्याकरीता, वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करण्याचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०१४ मध्ये नमुद असलेल्या व्होल्टेजपेक्षा कमी दाबावर वीज पुरवठा केलेल्या ग्राहकांना २% व्होल्टेज अधिभार लावण्यास मा. आयोगाने मंजूरी दयावी

आणि मा.आयोगाने निर्णय घेताना हया तरतुदीनुसार महावितरणची वितरण हानी कमी करण्याच्या आराखडयाचा विचार करावा.

- **कॅप्टीव्ह सोलर जनरेटर करीता टिओडी सवलत :-**

कॅप्टीव्ह सौर ऊर्जा निर्मात्यांसाठी रात्रीची टिओडी सवलत देतांना टिओडी -ए झोन मधून रोजचे सौर ऊर्जा निर्मिती (युनिट्स) वजा करण्याची विनंती महावितरण मा. आयोगाला करीत आहे.

- **वीजदरासंबंधी इतर विषय**

  - **मोबाईल टॉवर्स करीता वीजदर**

    मोबाईल टॉवर्स टेलीकम्युनिकेशनचे सिग्नल प्रक्षेपित व प्रोसेस करतात. यात कोणतीही औद्योगिक क्रिया किंवा उत्पादन होत नाही. मोबाईल टॉवरमध्ये कुठलीही उत्पादन प्रकीया वा औद्योगिक क्रिया होत नाही या बार्बीचा विचार करता महावितरण मोबाईल टॉवर्स करीता वाणिज्यीक दर प्रस्तावित करीत आहे. (लघुदाब-२ किंवा उच्चदाब-२ वर्गवारीनुसार)

  - **संकरित वाहनांच्या चार्जिंगसाठीचा वीजदर**

    सध्या भारतात संकरित वाहनांचा (हायब्रीड व्हेईकल्स) विकास करण्याचे नवीन प्रयत्न सुरू आहेत. जगभरात हे तंत्रज्ञान मोठया प्रमाणात विकसीत करून वापरण्याकरीता प्रयत्न चालू आहे. भविष्यातील मागणी आणि त्याची व्याप्ती याचा विचार करीता ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने विविध ठिकाणी चार्जिंग स्टेशनची मागणी राहील. म्हणून महावितरणने व्यावसायिक स्तरावरील संकरित वाहनांच्या चार्जीग करण्याच्या केंद्राना वाणिज्यीक दर (उच्चदाब-२ अथवा लघुदाब-२ वर्गवारीनुसार) प्रस्तावित केले आहेत. तसेच घरगुती, वाणिज्यिक किंवा औद्योगिक ठिकाणी वैयक्तिक संकरित वाहनांच्या चार्जिंगचे दर हे मुळ वर्गवारीनुसार लागू करण्यात यावे असे प्रस्तावित केलेले आहे.

- **लोड फॅक्टर प्रोत्साहन (इन्सेंटिव्ह)**

वीजेची उपलब्धता वाढल्यामुळे व २४ x ७ वीज पुरवठा असल्यामुळे महावितरणला असे वाटते की, लोड फॅक्टरची गणना करण्याच्या सुत्रात सुधारणा करणे गरजेचे आहे. ३० दिवसाच्या महिन्यामध्ये ६० तासांपर्यंत अंतर्भूत असलेली वीज पुरवठयातील व्यत्यय/विज पुरवठा बंदची तरतुद काढून टाकण्याची वेळ आलेली आहे अशी महावितरणची धारणा आहे. म्हणून महावितरण खालीलप्रमाणे तरतुद प्रस्तावित करीत आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या ६० तासांपर्यंत वीज पुरवठयातील व्यत्यय / बंदचा कालावधी वजा करण्याच्या अंतभूर्त तरतुदीऐवजी "महिन्यातील सर्व व्यत्ययाचा / वीज बंदचा कालावधी महिन्यातील एकूण तासांमधून वजा करण्यात यावा" अशी तरतुद प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार लोड फॅक्टर प्रोत्साहनच्या पात्रतेत सुधारणा करण्यात यावी व सध्याच्या विजेच्या उपलब्धतेनुसार १००% लोड फॅक्टर साठी जास्तीत जास्त १५% इतका लोड फॅक्टर प्रोत्साहन देण्यात यावा.

- **इतर वीज परवाना धारकांना पुरवठा करणे**

आपल्या क्षेत्रात असणाऱ्या सर्व विशेष आर्थिक क्षेत्रांना (SEZ) वीज पुरवठा करण्याकरीता खालील पध्दतीप्रमाणे प्रस्ताव महावितरण सादर करीत आहे. महावितरणकडून मागणी केलेल्या वीजेचा मागणी आकार रू.६०० प्रति केव्हीए प्रति महिना असावा. स्टँडबाय पॉवर करीता ब्लॉकवाईज फ्रिक्वेंसी बेस्ड युआय (UI) दराप्रमाणे किंवा महावितरणची मार्जिनल प्राईस (IEX धरून) यापैकी जे जास्त असेल त्याप्रमाणे वीज दर आकारण्यात येईल.

ओव्हर ड्रावल युनिट्सना, एसएमपी / युआय चार्जेस प्रमाणे किंवा महावितरणच्या तात्पुरत्या वर्गवारीसाठीच्या वीज दर यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे दर आकारण्यात येईल. सरकारी संस्थांची सामाजिक कर्तव्ये / बंधने लक्षात घेऊन विशेष आर्थिक क्षेत्र महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे / व्यवस्थापीत असल्यास वीज पुरवठा परस्पर अटी व शर्ती नुसार असावा असे महावितरण प्रस्तावित करीत आहे.

- **घरून व्यवसाय करणारे छोटे दुकानदार यांचेसाठी वीजदर**

मा. आयोगाने दि. १६ ऑगस्ट २०१२ च्या आदेशानुसार असे मत व्यक्त केले आहे की, जे ग्राहक महिन्याला ३०० युनिटस पेक्षा कमी वापर करतात त्यांना वेगळे वीजदर लावण्याची गरज नाही. त्यानुसार मा. आयोगाने निर्णय घेतला की, विविध वर्गवारीतील जे ग्राहक महिन्याला ३०० युनिट पेक्षा कमी वापर करतात त्यांना लघुदाब-१ वर्गवारीप्रमाणे वीजदर लावण्यात यावे. तसेच मा. आयोगाच्या असाही आदेश दिला की, जे ग्राहक लघुदाब-२, लघुदाब-५ आणि लघुदाब-१० वर्गवारीतील असतील व ज्यांचा महिन्याला ३०० युनिटस पेक्षा कमी वापर असेल आणि ज्यांचा मागील आर्थिक वर्षात ३६०० युनिटस पेक्षा कमी वापर झालेला असेल त्यांना लघुदाब-१ या वर्गवारीप्रमाणे वीजदर आकारण्यात यावा.

महावितरण असे प्रस्तावित करीत आहे की, बिगर घरगुती /वाणिज्यिक, औद्योगिक किंवा सार्वजनिक सेवा प्रवर्गातील ग्राहकांना हा लाभ देण्यात येवू नये कारण हया प्रस्तावाचा मुख्य उद्देश ज्यांचे घरीच दुकान आहे अश्या छोटया वाणिज्यिक ग्राहकांना लाभ देण्याचा आहे. तथापि, हे वीजेचे दर ठरविण्याच्या मुख्य तत्वाच्या विरूध्द आहे. कारण साधारणतः ज्या कारणाकरीता वीजेचा उपयोग आहे त्या आधारावर वीजदर ठरविण्यात येतो. म्हणून महावितरण असे प्रस्तावित करीत आहे की, ज्यांचे घरीच छोटे दुकान आहे अश्याच घरगुती ग्राहकांनाच घरगुती प्रवर्गाचा लाभ देण्यात यावा.

**आय) वीजदर प्रयोज्यता (ॲप्लीकेबीलीटी)**

महावितरणने ॲप्लीकेबीलीटीमध्ये बदल करण्याकरीता सुचविल्याप्रमाणे मा. आयोगाने त्यांच्या दिनांक १६ ऑगस्ट २०१२ च्या वीजदर आदेशानुसार सर्वकष प्रयोज्यतेस मान्यता दिली. तथापि, वीजदर प्रयोज्यततामध्ये काही संदिग्धता आहे आणि हे विचारात घेऊन महावितरणने वीजदर पुस्तिकेमध्ये वीजदर प्रयोज्यतेसंबंधी अजून काही बदल करण्याचे प्रस्तावित केलेआहे.

महावितरण पुढे सांगू इच्छिते की, द्वितीय नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २०१३-१४ आधीच पुर्ण झाले आहे. तसेच मा. आयोग ही याचिका प्रक्रिया पूर्ण करेल तो पर्यंत आर्थिक वर्ष २०१४-१५ चा बराच वेळ निघून गेलेला असेल. ही परिस्थिती लक्षात घेऊन, महावितरणची मा. आयोगांला विनंती आहे की, महावितरणला महसुली तुटींची वसुली १२ महिन्यात (एप्रिल २०१५ ते मार्च २०१६) करण्याची परवानगी द्यावी.

वसुलीकरीता असलेला कमी वेळ लक्षात घेऊन व मा. आयोगातर्फे अजूनही क्रॉस सबसीडी कमी करण्याच्या आराखडयास अंतिम स्वरूप देणे बाकी आहे हे विचारात घेऊन महावितरणने क्रॉस सबसीडी कमी करण्याचा आराखडा प्रस्तावित केलेला नाही. तथापी, महावितरणने सध्याच्या याचिकेमध्ये वेगवेगळया प्रवर्गासाठी असे वीजदर प्रस्तावित केले आहेत जेणेकरून ग्राहकांचा वीजदर हा सरासरी पुरवठयाच्या खर्चाच्या जवळ राहील.

- **वहन आकार (व्हिलींग चार्जेस)**

मा. आयोगाच्या दि. ०२ डिसेंबर २०१० च्या पुर्नविचार याचिकेवरील आदेशानुसार आणि वितरण प्रणाली व वीज पुरवठा खर्च विलगीकरण गुणोत्तरानुसार तसेच लघुदाब मुक्त प्रवेश ग्राहकांकरीता आर्थिक वर्ष २०१३-२०१४ (मा.आयोगाच्या दि.२९ ऑक्टोबर २०१३ च्या आदेशानुसार) साठीच्या मा.आयोगाने मान्य केलेल्या वितरण हानीपेक्षा वितरण हानी ०.५% कमी (आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता ०.२५% घट व आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता ०.२५% घट) विचारात घेऊन महावितरण आर्थिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ करीता लघुदाब व उच्चदाब पातळीवर वहन आकार व वहन हानी पुढीलप्रमाणे प्रस्तावित करीत आहे.

| **तपशिल** | **आर्थिक वर्ष २०१४-१५** | | **आर्थिक वर्ष २०१५-१६** | |
|---|---|---|---|---|
| | **वहन हानी %** | **वहन आकार (रु.प्रति युनिट)** | **वहन हानी %** | **वहनआकार (रु.प्रति युनिट)** |
| ३३ केव्ही स्तर | ६% | ०.२३ | ६% | ०.२२ |
| २२/११ केव्ही स्तर | ९% | १.२७ | ९% | १.२३ |
| लघुदाब स्थळ | १२.२५% | २.१७ | १२% | २.११ |

- **क्रॉस सबसिडी अधिभार**

प्रकरण क्र. ४३ /२०१० च्या अनुषंगाने दिनांक ९ सप्टेंबर २०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये व त्यानंतरच्या आदेशामध्ये मा. आयोगाने क्रॉस सबसिडी अधिभार ठरविण्यासाठी अंगिकारलेल्या पध्दतीनुसार आणि वर्ष २०१४-१५ व वर्ष २०१५-१६ करीता प्रस्तावित एकूण महसूलीची गरज लक्षात घेता महावितरणने क्रॉस सबसिडी अधिभार प्रस्तावित केलेला आहे. तो खालील तक्यात दिलेला आहे.

| अनु.क्र. | प्रवर्ग | उप प्रवर्ग | क्रॉस सबसीडी अधिभार आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता |
|---|---|---|---|
| | | | रूपये/युनिट |
| **अति उच्चदाब** | | | |
| १ | **उच्चदाब - १ औद्योगिक** | एक्सप्रेस फिडर | ४.४४ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ३.६६ |
| | | हंगामी | ६.९२ |
| २ | **उच्चदाब -२ वाणिज्यिक** | एक्सप्रेस फिडर | ९.३६ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ८.२२ |
| ३ | **उच्चदाब -३ रेल्वे** | रेल्वे | ४.३९ |
| ४ | **उच्चदाब -४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | एक्सप्रेस फिडर | १.६९ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | १.८६ |
| ५ | **उच्चदाब -६ घरगुती** | घरगुती | १.७० |
| ६ | **उच्चदाब -८ सार्वजनिक सेवा** | एक्सप्रेस फिडर | ५.६८ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ५.३६ |
| ७ | **उच्चदाब -९ पोर्टस्** | पोर्टस् (बंदर) | ७.२६ |
| **उच्चदाब ३३ केव्ही** | | | |
| १ | **उच्चदाब - १ औद्योगिक** | एक्सप्रेस फिडर | ३.९३ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ३.१५ |
| | | हंगामी | ६.४१ |
| २ | **उच्चदाब -२ वाणिज्यिक** | एक्सप्रेस फिडर | ८.८५ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ७.७१ |
| ३ | **उच्चदाब -३ रेल्वे** | रेल्वे | ३.८८ |
| ४ | **उच्चदाब -४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | एक्सप्रेस फिडर | १.१८ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | १.३६ |
| ५ | **उच्चदाब -६ घरगुती** | घरगुती वसाहत | १.१९ |
| ६ | **उच्चदाब -८ सार्वजनिक सेवा** | एक्सप्रेस फिडर | ५.१७ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ४.८५ |
| ७ | **उच्चदाब -९ पोर्टस्** | पोर्टस् (बंदर) | ६.७५ |
| **उच्चदाब २२/११ केव्ही** | | | |
| १ | **उच्चदाब - १ औद्योगिक** | एक्सप्रेस फिडर | २.७५ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | १.९७ |
| | | हंगामी | ५.२३ |
| २ | **उच्चदाब -२ वाणिज्यिक** | एक्सप्रेस फिडर | ७.६७ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ६.५३ |
| ३ | **उच्चदाब -३ रेल्वे** | रेल्वे | २.७० |
| ४ | **उच्चदाब -४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | एक्सप्रेस फिडर | - |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ०.१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| **५** | **उच्चदाब -६ घरगुती** | घरगुती | ०.०१ |
| **६** | **उच्चदाब -८ सार्वजनिक सेवा** | एक्सप्रेस फिडर | ३.९९ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | ३.६७ |
| **७** | **उच्चदाब -९ पोर्टस्** | पोर्टस् (बंदर) | ५.५७ |
| **लघुदाब पातळी** | | | |
| **१** | **बिगर घरगुती** | | |
| | ०-२० कि.वॅ. पर्यंत | ०-२० कि.वॅ. | |
| | ०-२०० युनिट | | ०.६० |
| | २०० युनिट पेक्षा अधिक | | ३.९८ |
| | >२० कि.वॅ. आणि <५० कि.वॅ. | >२० कि.वॅ.आणि <५० कि.वॅ. | ४.५९ |
| | ५० कि.वॅ. पेक्षा अधिक | ५० कि.वॅ. पेक्षा अधिक | ७.५१ |
| **२** | **औद्योगिक** | | |
| | २० कि.वॅ. पेक्षा कमी | २० कि.वॅ. | - |
| | २० कि.वॅ. पेक्षा अधिक | २० कि.वॅ. पेक्षा अधिक | २.०० |

सामान्यपणे, मा. आयोगातर्फे जेव्हा जेव्हा क्रॉस सबसिडी अधिभार ठरविला जातो, तेव्हा तो आदेश काढलेल्या तारखेपासून अधिभार लागू होतो. मा. आयोगाने प्र.क्र. ३८/२०१४ मधील दिलेल्या आदेशानुसार काही अतिरिक्त आकारांना परवानगी दिल्यामुळे वर्ष २०१४-१५ मध्ये महावितरणच्या ग्राहकांच्या वीज दरामध्ये वाढ झालेली होती. सरासरी देयक दरामध्ये बदल झाल्यामुळे क्रॉस सबसिडी अधिभारामध्ये पुन्हा सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली, त्यानुसार प्र.क्र. १६९/२०१४ अन्वये, मा. आयोगाला आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी क्रॉस सबसिडी अधिभार पुर्न:निर्धारणाकरीता प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र, बहुवार्षिक वीजदर याचिकेमध्ये अतिरिक्त माहिती सादर करण्याचे स्वातंत्र्य घेत महावितरणने सदर याचिका मागे घेतली.

मुक्त प्रवेश विनियमामध्ये ठरविल्यानुसार, क्रॉस सबसीडी अधिभार हा ग्राहकांच्या वीजदर प्रवर्ग / विजदरांचे टप्पे / किंवा व्होल्टेज पातळी वर जोडलेल्या ग्राहकांच्या सध्याच्या क्रॉस सबसीडीच्या पातळीवर आधारित असेल. त्यानुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या ग्राहकांनी मुक्त प्रवेशाची निवड केली आहे अश्या ग्राहकांकडून इतर ग्राहकांवरील ओझे टाळण्यासाठी, मा. आयोगाच्या प्रकरण क्रमांक ३८/२०१४ च्या आदेशानुसार सध्याच्या क्रॉस सबसीडीच्या पातळीवर भरपाई आकारणे गरजेचे आहे. म्हणून महावितरणने मा. आयोगाला १ एप्रिल २०१४ पासून आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी वरील प्रमाणे क्रॉस सबसीडी अधिभार मान्य करण्याची विनंती केली आहे.

| अनु.क्र. | प्रवर्ग | उप प्रवर्ग | क्रॉस सबसीडी अधिभार आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता<br>रूपये/युनिट |
|---|---|---|---|
| **अति उच्चदाब** | | | |
| १ | उच्चदाब -I | औद्योगिक | ३.८८ |
| | | हंगामी | ६.९९ |
| २ | उच्चदाब -II | वाणिज्यिक | ८.६४ |
| ३ | उच्चदाब -III | रेल्वे | ४.८४ |
| ४ | उच्चदाब -IV | सार्वजनिक पाणीपुरवठा | २.१८ |
| ५ | उच्चदाब -VI | घरगुती वसाहत | ३.३० |
| ६ | उच्चदाब -VIII | सार्वजनिक सेवा | ६.०८ |
| ७ | उच्चदाब -IX | पोर्टस् (बंदरे) | ७.७८ |
| **उच्चदाब ३३ केव्ही** | | | |
| १ | उच्चदाब -I | औद्योगिक | ३.३७ |
| | | हंगामी | ६.४७ |
| २ | उच्चदाब -II | वाणिज्यिक | ८.१३ |
| ३ | उच्चदाब -III | रेल्वे | ४.३३ |
| ४ | उच्चदाब -IV | सार्वजनिक पाणीपुरवठा | १.६७ |
| ५ | उच्चदाब -VI | घरगुती वसाहत | २.७८ |
| ६ | उच्चदाब -VIII | सार्वजनिक सेवा | ५.५७ |
| ७ | उच्चदाब -IX | पोर्टस् (बंदरे) | ७.२६ |
| **उच्चदाब २२/११ केव्ही** | | | |
| १ | उच्चदाब -I | औद्योगिक | २.२१ |
| | | हंगामी | ५.३२ |
| २ | उच्चदाब -II | वाणिज्यिक | ६.९७ |
| ३ | उच्चदाब -III | रेल्वे | ३.१७ |
| ४ | उच्चदाब -IV | सार्वजनिक पाणीपुरवठा | ०.५१ |
| ५ | उच्चदाब -VI | घरगुती वसाहत | १.६३ |
| ६ | उच्चदाब -VIII | सार्वजनिक सेवा | ४.४१ |
| ७ | उच्चदाब -IX | पोर्टस् (बंदरे) | ६.११ |
| **लघुदाब पातळी** | | | |
| १ | लघुदाब- II | | |
| | ०-२० कि.वॅ. | ०-२० कि.वॅ. | |
| | ०-२०० युनिट | | ०.८६ |
| | २०० युनिट पेक्षा अधिक | | ३.९१ |
| | >२० कि.वॅ. आणि <५० कि.वॅ. | >२० कि.वॅ. आणि <५० कि.वॅ. | ४.६२ |
| | ५० कि.वॅ. पेक्षा अधिक | ५० कि.वॅ. पेक्षा अधिक | ६.२५ |
| २ | लघुदाब- V | | |
| | २० कि.वॅ. पेक्षा अधिक | २० कि.वॅ. पेक्षा अधिक | १.३६ |

**वीजदर पत्रक**

महावितरण येथे सादर करू इच्छिते की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०११ यातील विनियम ८.४ मध्ये वीजदर व आकार पासून मिळणाऱ्या अपेक्षित महसुलाचे अंदाज करण्याचे तत्व देण्यात आलेले आहेत व ते खालीलप्रमाणे पुर्नमुद्रीत केलेले आहे.

*"अर्जदार, खालील बाबींच्या आधारे, वीजदर व आकारांपासून मिळणाऱ्या अपेक्षित महसुलांचे अंदाज विकसीत करेल:-*

***(ए)*** *...*

***(बी)*** *वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता ग्राहकांना पुरवठा करावयाच्या आणि वितरण यंत्रणा उपयोग कर्त्याच्या वतीने वहन करावयाच्या वीजेचे अंदाजीत परिमाण; आणि*

***(सी)*** *अर्ज सादर करण्याच्या दिनांकास असलेला विद्यमान विजदर."*

त्यानुसार, महावितरणने बहुवर्षीय विजदर याचिका दाखल केलेल्या तारखेस लागू असणा-या दरानुसार महसुल अनुमानित केले आहे. महावितरण यापुढे असे सादर करु इच्छिते की, मा. आयोगाने दिनांक ३ मार्च २०१४ च्या प्रकरण क्र. ३८/२०१४, अंतरिम आदेशामध्ये असा निर्णय दिला की, अंतरिम आदेश हा दिनांक १ मार्च २०१४ पासून दि.२८ फेब्रुवारी २०१५ पर्यंतच्या महावितरणच्या विज देयकामध्ये लागू राहील. मा. आयोगाने असाही निर्णय दिला की, महावितरणने प्रस्तावित केलेले अतिरिक्त विद्युत आकार- २, सदर आदेशाच्या परीच्छेद ४३ च्या निर्देशीत शर्तीच्या अधिन राहून आकारण्यात येईल. त्याप्रमाणे महानिर्मिती व महापारेषण या कंपनीच्या बहुवार्षिय विजदर आदेशाच्या अनुषंगाने महावितरणने अतिरिक्त आकार आकारणे सुरू केले.

म्हणून, बहुवार्षिय विजदर याचिका दाखल करण्याच्या तारखेला महावितरणचे असलेले विद्यमान दर (अतिरिक्त आकारासह) व प्रस्तावित वीजदर यांची तुलना खाली दर्शविली आहे.

उपरोक्त नमुद केलेले वीजदर तत्व विचारात घेवून महावितरणने, सुधारित वीजदर खालीलप्रमाणे प्रस्तावित केले आहेत.

| प्रवर्ग | स्थिर / मागणी आकार | | % वाढ/घट | विद्युत आकार | | % वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | प्रस्तावित दर | | विद्यमान दर | प्रस्तावित दर | |
| | रू./केव्हीए/ महिना | रू./केव्हीए/ महिना | | पैसे/युनिट | पैसे/युनिट | |
| **उच्चदाब प्रवर्ग** | | | | | | |
| **उच्चदाब - १ औद्योगिक** | | | | | | |
| उच्चदाब-१ अविरत (एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | ८५९ | ८१६ | -५% |
| उच्चदाब अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | ७८२ | ८१६ | ४% |
| उच्चदाब - १ हंगामी | १९० | २२० | १६% | ९६० | ९५५ | ०% |
| **उच्चदाब-२ वाणिज्यिक** | | | | | | |
| उच्चदाब-२ अविरत (एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | १,२८२ | १,२४० | -३% |
| उच्चदाब-२ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | १,२०८ | १,२४० | ३% |
| **उच्चदाब-३ रेल्वे** | | | | ९४१ | १,०१२ | ८% |
| **उच्चदाब-४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | | |
| उच्चदाब-४ अविरत (एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | ६१९ | ६७६ | ९% |
| उच्चदाब-४ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | ५९० | ६७६ | १५% |
| **उच्चदाब-५ कृषी** | ३० | ३० | ०% | ३५१ | ३५१ | ०% |
| **उच्चदाब-६ एकगठ्ठा पुरवठा** | १६० | | | ५९४-९८९ | | |
| उच्चदाब-६ घरगुती (नवीन प्रस्तावित) | | २२० | | | ७५० | |
| **उच्चदाब-७ तात्पुरता पुरवठा** | | | | | | |
| धार्मिक प्रयोजन | २५० | २९० | १६% | ३९४ | ४२० | ७% |
| अन्य प्रयोजन | २५० | २९० | १६% | १,६०० | १,६७१ | ४% |
| **उच्चदाब-८ सार्वजनिक सेवा** | | | | | | |
| उच्चदाब-८ अविरत (एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | १,०१२ | १,०५० | ४% |
| उच्चदाब-८ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | १९० | २२० | १६% | ९४५ | १,०५० | ११% |
| **उच्चदाब-९ पोर्टस्** | १९० | २२० | १६% | १,१८६ | १,२५७ | ६% |
| **उच्चदाब-१० शासकीय शैक्षणिक संस्था आणि दवाखाने (नवीन प्रस्तावित)** | | २२० | | | ६५९ | |

| प्रवर्ग | स्थिर / मागणी आकार | | % वाढ/घट | विद्युत आकार | | % वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | प्रस्तावित दर | | विद्यमान दर | प्रस्तावित दर | |
| | रू./जोडणी/ महिना | रू./जोडणी/ महिना | | पैसे/युनिट | पैसे/युनिट | |
| **लघुदाब प्रवर्ग** | | | | | | |
| लघुदाब - १ घरगुती | | | | | | |
| बीपीएल (०-३० युनिट) | १० | १० | ०% | १०० | १०० | ०% |
| ३० युनिटपेक्षा अधिक वापर | | | | | | |
| **०-१२५ युनिट दरमहा** | | | | | | |
| ०-७५ युनिटस | ४० | ५० | २५% | ४१६-७३९ | ४१६ | |
| ७६ - १२५ युनिट | ४० | ५० | २५% | | ५५५ | |
| **१२६ - ३०० युनिट दरमहा** | | | | | | |
| ०-१२५ युनिट | ४० | ५० | २५% | ४१६-७३९ | ५७५ | |
| १२६ - ३०० युनिट | ४० | ५० | २५% | | ७१० | |
| **३०१-५०० युनिट दरमहा** | | | | | | |
| ०-१२५ युनिट | ४० | ५० | २५% | ४१६-९५९ | ७५० | |
| १२६-३०० युनिट | ४० | ५० | २५% | | ८०० | |
| ३०० युनिट पेक्षा अधिक | ४० | ५० | २५% | | ९५० | |
| **५०१-१००० युनिट** | ४० | ५० | २५% | ४१६-१०५९ | ९७५ | |
| **१००० युनिटपेक्षा अधिक** | ४० | ५० | २५% | ४१६-११३८ | १०५० | |
| ३ फेज जोडणी | १३० | १५० | १५% | | | |
| **लघुदाब-२ बिगर घरगुती** | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | | | | | | |
| ०-२०० युनिट | १९० | २२० | १६% | ७३० | ७६० | ४% |
| २०० युनिट पेक्षा अधिक | १९० | २२० | १६% | १०६१ | १,०५६ | ०% |
| >२०-५० कि.वॅ.* | १९० | २२० | १६% | १०५१ | १,०४६ | ०% |
| >५० कि.वॅ.* | १९० | २२० | १६% | १३४९ | १,२१५ | -१०% |
| **लघुदाब- ३ सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | | |
| ०-२० कि.वॅ.* | ५० | ६० | २०% | २९१ | ३६२ | २४% |
| २०-४० कि.वॅ.* | ६० | ७० | १७% | ३८२ | ४५३ | १९% |
| ४०-५० कि.वॅ.* | ९० | १०५ | १७% | ५१७ | ५८८ | १४% |

सुचना :-

* स्थिर आकार / मागणी आकार रू./केव्हीए/महिना.

** स्थिर आकार / मागणी आकार रू./एच पी/महिना.

*** स्थिर आकार / मागणी आकार रू./केडब्ल्यू/महिना.

| प्रवर्ग | स्थिर / मागणी आकार | | % वाढ/घट | विद्युत आकार | | % वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | प्रस्तावित दर | | विद्यमान दर | प्रस्तावित दर | |
| | रू./जोडणी/ महिना | रू./जोडणी/ महिना | | पैसे/युनिट | पैसे/युनिट | |
| **लघुदाब प्रवर्ग** | | | | | | |
| **लघुदाब - ४ कृषी** | | | | | | |
| मीटर रहिताचा दर | | | | | | |
| (वार्षिक > १३१८ तास/अ.श.) वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे ** | | | | | | |
| ०-५ एचपी | ३५३ | ३५३ | ०% | | | ०% |
| ५ एचपी पेक्षा अधिक | ३८३ | ३८३ | ०% | | | ०% |
| (वार्षिक < १३१८ तास/अ.श.) वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे ** | | | | | | |
| ०-५ एचपी | २६८ | २६८ | ०% | | | ०% |
| ५ एचपी पेक्षा अधिक | २९३ | २९३ | ०% | | | ०% |
| मीटरचे दर | २० | २० | ०% | २५८ | २५८ | ०% |
| **लघुदाब- ५ औद्योगिक** | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | १९० | २२० | १६% | ६१५ | ६१० | -१% |
| २० कि.वॅ. पेक्षा अधिक* | १३० | १५० | १५% | ८७५ | ८१६ | -७% |
| **लघुदाब- ६ पथ दिवे** *** | | | | | | |
| ग्रामपंचायत अ,ब, आणि क गटातील व नगरपालिका | ४० | ५० | २५% | ५०२ | ६५९ | ३१% |
| महानगरपालिका | ४० | ५० | २५% | ६०४ | ६९२ | १५% |
| **लघुदाब-७ तात्पुरता विद्युत पुरवठा** | | | | | | |
| तात्पुरत्या जोडण्या (धार्मिक प्रयोजन) | २५० | २९० | १६% | ४०९ | ४८० | १७% |
| तात्पुरत्या जोडण्या (अन्य प्रयोजन) | ३१० | ३६० | १६% | १८२५ | १८९६ | ४% |
| **लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलक** | ५०० | ५७५ | १५% | २५५५ | २६२६ | ३% |
| **लघुदाब-९ स्मशानभूमी आणि दफनभूमी** | २५० | २९० | १६% | ४१३ | ४८४ | १७% |
| **लघुदाब-१० सार्वजनिक सेवा** | | | | | | |
| ०-२०० युनिटस | १९० | २२० | १६% | ६५० | ७२१ | ११% |
| >२०० युनिटस | १९० | २२० | १६% | ९५८ | १०२९ | ७% |
| >२०-५० कि.वॅ.* | १९० | २२० | १६% | ९७२ | १०४३ | ७% |
| >५० कि.वॅ.* | १९० | २२० | १६% | १०२८ | १०९९ | ७% |
| **लघुदाब-११ पोर्टस (नविन प्रस्तावित)** | | २२० | | | ९१७ | |
| **लघुदाब-१२ शासकीय शैक्षणिक संस्था आणि दवाखाने (नवीन प्रस्तावित)** | | २२० | | | ६५९ | |

सुचना :-

* स्थिर आकार / मागणी आकार रू./केव्हीए/महिना.

** स्थिर आकार / मागणी आकार रू./एच पी/महिना.

*** स्थिर आकार / मागणी आकार रू./केडब्ल्यू/महिना.

महावितरणची मा. आयोगाला विनंती आहे की, वीजदरा संबंधीचे तत्व, प्रस्तावित नवीन प्रवर्ग व इतर सुचना विचारात घेवून दि.१ एप्रिल २०१५ पासून सुधारीत विजदर देण्यात यावे.

**प्रार्थनाः**

**सन्माननीय आयोगास महावितरण कंपनीची आदरपूर्वक प्रार्थना आहे की :**

१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०११ च्या वेळोवेळी सुधारणा केलेल्या तरतुदीनुसार सुधारीत बहुवर्षीय वीजदर याचिका मा. आयोगाने पुढील कार्यवाहीसाठी दाखल करून घ्यावी.

२) महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ साठी प्रस्तावित केलेली एकूण महसुलाची गरज व एकूण महसुली तुट इतर दाव्यासह वसुल करण्यास परवानगी दयावी.

३) केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २०१४ नुसार केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने मंजूरी दिलेल्या केंद्र शासनाच्या वीज निर्मिती केंद्राच्या स्थिर खर्चामध्ये काही बदल झाल्यास त्या प्रमाणे अतिरिक्त आकार वसूल करण्याची महावितरणला परवानगी मिळावी.

४) महावितरणने प्रस्तावित केलेल्या वीजदरांची तत्वे व इतर सुचनांचा विचार करून दि.१ एप्रिल २०१५ पासून महसूली तुटीच्या वसुलीस व वीजदर पत्रकास मंजूरी मिळावी.

५) स्थिर खर्चाची वसुली पूर्णपणे स्थिर आकारामधूनच व्हावी यासाठी बीपीएल व कृषी (मीटर सहित) ग्राहकां व्यतिरिक्त सर्व ग्राहक वर्गासाठी स्थिर आकाराचे वाजवीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी.

६) वेळेनुसार वीज वापर (टीओडी मिटर) असलेल्या ग्राहकांना रात्रीच्या वीज वापरासाठी लागू असलेली विद्यमान सवलतीमध्ये २५० पैसे प्रति युनिट ऐवजी १५० पैसे प्रति युनिट अशी सुधारणा करण्यास मंजूरी मिळावी. (रात्री १०.०० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६.०० पर्यंत)

७) पॉवर फॅक्टर इन्सेंटीव्ह युनिटी पॉवर फॅक्टरसाठी ५% एवढे निश्चित करण्याची मंजूरी मिळावी.

८) महावितरणने घरगुती वर्गवारीसाठी प्रस्तावित केलेली नवीन वीज वापराचे टप्पे व वीजदराला परवानगी मिळावी.

९) सुधारलेली वीज पुरवठयाची परिस्थिती लक्षात घेता उच्चदाब अविरत व अविरत नसलेले (एक्स्प्रेस व नॉन एक्स्प्रेस) प्रवर्गाचे विलीनीकरण करण्याची मंजूरी देण्यात यावी.

१०) लघुदाब ५ - उद्योग २० कि.वॅ. पेक्षा अधिक (२७ एचपी पेक्षा अधिक) उप वर्गवारीचे विद्युत आकार उच्चदाब - औद्योगिक प्रवर्गाच्या विद्युत आकारासमान आकारण्याची मंजूरी मिळावी.

११) ग्रामपंचायत अ,ब,क आणि नगर पालिकांच्या क्षेत्रातील पथदिवे या प्रवर्गातील वीजदर हे आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या सरासरी वीज पुरवठा खर्चाच्या पातळीवर व महानगरपालिका क्षेत्रातील पथदिवे या प्रवर्गातील वीजदर आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या सरासरी वीज पुरवठा खर्चाच्या ५% जास्त आकारण्याची परवानगी देण्यात यावी.

१२) लघुदाब / उच्चदाब या ग्राहक वर्गवारीतील शासकीय मालकीच्या, शासनाचे व्यवस्थापन असलेल्या व शासनातर्फे चालणाऱ्या शिक्षण संस्था (उदा : जिल्हा परिषद शाळा / नगरपालिका व महानगरपालिका शाळा/ शासकीय वैद्यकीय / अभियांत्रिकी महाविद्यालय इ.) पण शासकीय अनुदान प्राप्त शिक्षण

संस्था वगळून, तसेच शासकीय मालकीची रूग्णालये (उदाः जिल्हा नागरी रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र इ.) यांच्यासाठी नवीन ग्राहक वर्गवारी प्रस्तावित करण्यास परवानगी मिळावी.

१३) सिंगल पॉईट सप्लाय घेणाऱ्या उच्चदाब एक गठ्ठा पुरवठा हा प्रवर्ग काढून टाकण्याच्या महावितरणच्या प्रस्तावास परवानगी मिळावी.

१४) उच्चदाब घरगुती ग्राहकांसाठी वेगळा उच्चदाब घरगुती ग्राहक प्रवर्ग निर्माण करण्याची अनुमती दयावी.

१५) महावितरणने प्रस्तावित केलेले प्रवर्गनिहाय विजदर मंजूर करण्यात यावे.

१६) कॅप्टीव्ह वीज निर्मितीसाठी स्टॅन्डबाय शुल्क आकारण्याच्या अटी सुधारण्याबाबत महावितरणच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

१७) बिलींग डिमांड संबंधीच्या विद्यमान तरतुदीत बदल करून उच्चतम मागणी व्यतिरिक्त (ऑफ पीक पिरीयड) इतर कालावधीत नोंदविलेल्या डिमांडचा बिलिंग डिमांड मध्ये समावेश करण्यास मंजूरी द्यावी.

१८) मुक्त प्रवेश संबंधातील ग्राहकांसाठी आर्थिक वर्ष २०१४-१५ व आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी महावितरणने प्रस्तावित केलेले क्रॉस सबसिडी अधिभार व इतर सर्व आकार जसे वहन आकार व वहन हानी इत्यादी मंजूर करण्यात यावे.

१९) महावितरणने गणना केलेले आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता क्रॉस सबसीडी अधिभार दि. १ एप्रिल २०१४ पासून वसूल करण्यास परवानगी दयावी.

२०) अपारंपारिक ऊर्जा वीज खरेदीपोटी होणारा वाढीव खर्च प्रदूषण पसरविणा-या उद्योगांकडून विशिष्ट आकाराद्वारे वसूल करण्याची परवानगी देण्यात यावी.

२१) राज्याच्या सीमेवर वसलेल्या गावांतील ग्राहकांसाठी होणाऱ्या आंतरराज्य वीजेची देवाणघेवाण व त्यासाठीच्या वीज दरांबाबत केलेल्या सुचनांचा विचार करण्यात यावा.

२२) वीजदर प्रयोज्यतेत महावितरणने सुचविलेले विविध प्रकारच्या उपक्रमासाठीचे वर्गवारीकरण मंजुर करण्यात यावे.

२३) या आधीच मंजुर केलेल्या परंतु बहुवर्षिय वीजदर कार्यवाही द्वारेच वसुलीस परवानगी दिलेल्या प्रलंबित रकमेवर कॅरींग कॉस्ट मंजुर करण्यात यावी.

२४) भविष्यात जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा महावितरणला सध्याच्या आकारांच्या अनुसुचीत सुधारणा करण्यासाठी याचिका दाखल करण्याची परवानगी मिळावी.

२५) माननीय आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही सहाय्य, मदत मंजूर करावी.

२६) माननीय आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही आदेश, प्रकरणातील परिस्थिती व न्यायहिताच्या दृष्टीने देण्यात यावेत.

२७) कोणतीही चूक / भुल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी देण्यात यावी.

२८) सदर विनंती अर्ज सादर कर्त्यास या अर्जात गरज असल्यास वेळोवेळी कोणतीही भर टाकणे किंवा त्यात बदल करणे तसेच अतिरिक्त माहिती सादर करण्याची परवानगी देण्यात यावी.